# भारतातील न्यायालयीन सक्रीयता

प्रा मनिषा शंकर यादव
श्री. गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूर- ७ , जि४४४१०. अकोला.

---

**प्रस्तावना :-**

भारतीय राज्य घटनेच्या ५ व ६ व्या भागात कलम १२४ ते १४६ मध्ये न्यायव्यवस्थेबाबतची तरतूद आढळून येते भारतीय न्यायव्यवस्थेला वैदिक काळापासूनचा कारण असलेला दिसून येतो पण भारतात न्यायव्यवस्था खऱ्याच अर्थाने बहरली ती ब्रिटिश कालखंडात कारण त्या आधी बऱ्याच ठिकाणी 'बळी तो कान पिळी' 'मत्स्य न्याय' हिच निती आढळूत होती न्याय हा नेहमी बहुसंख्याक सत्ताधारी लोकांचा असायचा त्यामूळे तो न्याय नव्हता अल्पसंख्याक मात्र विनाकारण त्यास बळी पडत असत 'पारधी' समाजा बाबत ब्रिटिश कालीन कायदे आज भारतातील पारधी जमातीस गुन्हेगार ठरवताना दिसतात ते बदल्याची व न्यायाचे कायदयाचे राज्य निर्माण करण्याची गरज पडते.

ब्रिटिशानी व्यापाराचे धोरण सोडून जेव्हा भारतात रजकारभार करावयास सुरवात केली तेव्हा इंग्लडच्या राणीच्या आदेशानुसार ब्रिटिश प्रशासन जिथे जिथे असेल तिथे ते कायदयाच्या राज्यावर असेल हा आदेश हि प्रमाण मानण्यात आला ब्रिटिशांनी आजवर कायदा सूव्यवस्था केल्याचे दिसून येते व याच धोरणाचा प्रभाव असेल म्हणून कदाचित १८६१ च्या कायदयानूसार मुंबई, मद्रास, कलकत्ता, लाहोर, आलाहाबाद, पाटणा या ठिकाणी उच्च न्यायालये स्थापन करण्यात आली. या उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द अपील करावयाचे असेल तर भारतीयांना इंग्लडमधील 'प्रिव्ही कौन्सीलकडे' अपील करावे लागे त्यामुळे खूप कमी तंटे प्रिव्ही कौन्सीलपर्यत पोहचत असत.

कालातराने ब्रिटिशानी भारतात १९३५ च्या कायदयानुसार 'संघराज्य शासन पध्दती' निर्माण केली त्यातील ११ प्रांत व देशीराज्ये यांचा समावेश संघराज्यात केला या संघराज्यातील केंद्र व घटकराज्य यामधील संघर्ष मिटवण्यासाठी सांघिक न्यायालयाची निर्मिती केली या साघिक न्यायालयाला 'फेडरल कोर्ट ऑफ इंडिया' असे संबोधण्यात आले. भारतातील मुंबई, मद्रास, कलकत्ता, लाहोर, पाटणा, अलाहाबाद या उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द फेडरल कोर्टात अपील करता येत असे. फेडरल कोर्टाच्या निर्णयावरही समाधान झाले नाही तर शेवटी अंतीम अपील 'प्रिव्ही कौन्सिल' हेच असे भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर फेडरल कोर्टाची जागा १९५० साली 'सर्वोच्च न्यायालयाने' घेतली ते दिल्ली येथे असून भारतातील एकेरी न्यायव्यवस्थेत अपीलाचे ते अंतीम टोक आहे.

**भारतातील प्राचीन न्यायव्यवस्था :-**

ब्रिटिश भारतात येण्या आधी भारतामध्ये प्रामुख्याने राजे महाराजे, पंचायती, जात पंचायती, खाप पंचायती यांच्या माध्यमातून न्यायदान केले जात असे आजही महाराष्ट्र, राज्यस्थान, पंजाब याठिकाणी पंचायती, जातपंचायती, खापपंचायतीच्या माध्यमातून गावचे न्यायदान केल्याचे संदर्भ दिसून येतात. भारतात अकबराची न्यायपध्दती, शिवाजी जिजाऊ न्याय पध्दती पेशवेकालीन रामशास्त्री प्रभूणे न्याय पध्दती सर्वात चांगली असल्याचे संदर्भ इतिहासात सापडतात. कालातराने ब्रिटिश भारतात आल्यानंतर राजे, महाराजे, पंचायतीच्या ,माध्यमातून केली जाणारी न्याय व्यवस्था मोडकळीस आणली व ब्रिटिश न्यायव्यवस्थेचा पाया भारतात घातला या बरोबर प्रत्येक प्रांतात उच्च न्यायालयाची व्यवस्थाही केली.

**भारतातील सर्वोच्च न्यायालय :-**

भारतीय सर्वोच्च न्यायालयाची स्थापना कलम १२४ नुसार झालेली दिसून येते भारतात एकेरी न्यायव्यवस्था व सर्वात शेवटी कनिष्ठ न्यायालयेआहेत या कनिष्ठ न्यायालयाच्या खाली ही इतर न्यायालये म्हणजे ४२ वी घटना दुरुस्तीने निर्माण केलेले प्रशासकीय न्यायालय, राजस्व न्यायालय, कामगार न्यायालय, कामगार तंटे सोडवताना दिसून येतात याशिवाय जलदगती न्यायालये, स्थानिक पातळीवरील लोकप्रिय झ ाालेली दिसून येतात भारतीातील सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशाची नेमणूक राष्ट्रपतीकडून होते व सरन्यायाधीशाच्या सल्ल्याने इतर न्यायाधीशाची नेमणूक राष्ट्रपती करतो भारतीय न्यायालयात चालवताना दिसतात भारतीय सर्वोच्च न्यायालयास 'अभिलेख न्यायालय' म्हटले जाते कारण या न्यायालयातील निर्णय सर्व न्यायालयात प्रमाण मानले जातात त्यावर कोणलाही टिका टिप्पणी करता येत नाही जर केली तर तो एक प्रकारे न्यायालयाचा अवमान मानला जातो याबरोबर भारतीय सर्वोच्च न्यायालयास निर्णयावर पुर्नविचार करण्याचा अधिकार दिला आहे न्यायालयीन निर्णयावर पुर्नविलोकनाच्या माध्यमातून कायदे मंडळाने केलेला कायदा राज्य घटनेशी सुसंगत आहे. सुसंगत आहे की नाही ते पाहण्याचा नसल्यास ते घटना बाह्य घोषित करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयास दिलेला आहे 'अमेरिकत न्या. मार्शल' यांनी 'मारबरी विरुध्द मेडिसन' खटल्यात वापरलेला 'न्यायालयीन पुर्नविलोकनाचा' अधिकार भारतीय न्यायव्यवस्थेत हि स्विकारलेला दिसून येतो. राज्यघटना हा देशाचा सर्वोच्च कायदा असल्यामुळे त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाचा असतो त्या सर्वोच्च कायदयामध्ये (राज्यघटनेत) सत्तारुढ पक्ष बहुमताच्या आधारावर जनमताला हाताशी धरुन गैरकायदे करित असेल तर वेळीच त्यास प्रतिबंध घालण्याचा अधिकार न्यायमंडळास मिळालेला दिसून येतो.

सर्वोच्च न्यायालय मूलभूत अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी तसेच मूलभूत अधिकाराचे हनन जर घेत असेल तर सर्वोच्च न्यायालय कलम ३२ नुसार बंदीप्रत्यक्षीकरण, उत्प्रेषण, प्राकर्षन, अधिकापृच्छा , परमादेश याचा वापर करु व्यक्तीवरील अन्याय दूर करते त्याच बरोबर हा अधिकार कलम २२६ नुसार उच्च न्यायालयाला प्राप्त झाला आहे तसाच तो मॅजिस्टेट कोर्टाला कलम १३३ नुसार प्राप्त झालेला दिसतो.

**भारतातील न्यायालयीन सक्रीयता :-**

राज्यघटनेचे संरक्षण राज्य घटनेतील कलमाचा अर्थ लावणे नागरीकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करणे हि अतिशय महत्वाची कार्ये न्यायालयाची मानली जातात. ९९ अपराधी सूटले तरी चालतील पण एका निरापराध्यास शिक्षा होता कामानये या तत्वावर भारतीय न्याय व्यवस्था कार्य करताना दिसून येते असे असेल तरी भारतीय कायदेमंडळात मात्र अशिक्षीत, कायदयाचे ज्ञान नसणारे, हौसे नवसे, गवसे कायदे तयार करताना दिसून येतात व याचा परिणाम असा होतो की अशा लोकांशी तयार केलेल्या कायदयाचा अर्थ लावण्याचे काम मात्र उच्च विदयाविभूषीत कायदाप्रवीण न्यायाधीशाना करावे लागते कधी कधी तर कायदेमंडळातील सदस्य अनावश्यक कायदे निर्मितीस प्रोत्साहन देताना दिसून येतात अशावेळी न्यायालयास सक्रीय होऊन आपली जबाबदारी पार पाडावी लागते.

*** याख्या :-**

१) कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ यांना राज्यघटनेने दिलेली कार्ये व्यवस्थित रित्या पार पाडत नसतील व त्यामूळे लोकशाही शासन, प्रशासन, राजकारण, याला धोका निर्माण होत असेल तर त्यावेळी न्याय मंडळ आपणहून सक्रीय होऊन कायदेमंडळ व कार्यकारी मंडळास आपल्या जबाबदारीची जाणीव करुन देते या सर्व न्यायालयाच्या प्रक्रियेस न्यायालयीन सक्रीयता असे म्हणतात.

२) कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ यांच्याकडून होणाऱ्या पण न झालेल्या कामाची अपेक्षा जनता न्यायालया कडून करते व न्यायालय याबाबत पुढाकार घेऊन जनतेच्या अपेक्षा पूर्ण करते व त्या करण्यासाठी कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांना निर्देश देते त्या न्यायालयाच्या प्रक्रियेस न्यायीक क्रियाशीलता किंवा न्यायालयीन सक्रीयता असे म्हणतात.

*** न्यायालयीन सक्रीयतेची कारणे :-**

१) कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ आपले काम व्यवस्थित करीत नसेल तर न्यायालय सक्रीय होते.

२) नागरीकांच्या मूलभूत अधिकारांना धोका निर्माण झाल्यास

३) संसद आपले कार्य करण्यास सक्षम नसेल

४) देशात आणीबाणी असेल

अशावेळी समाजाहितासाठी न्यायालय आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन सक्रीय होऊन आपले कर्तव्य पार पाडते.

**न्यायालयीन सक्रीयतेस चालना देणारे घटक :-**

**१) लोकस स्टॅडी - Locus Standi :-**

लोकस स्टॅडी या शब्दाचा अर्थ ज्या व्यक्तीवर अन्याय झालेला आहे त्या व्यक्तीने न्यायालयत उभे राहून दाद मागणे होय. यामुळे न्यायालयीन सक्रीयता वाढताना दिसून येत आहे.

**२) सू मोटो - Suo Moto :-**

वर्तमानपत्रातील एखादी बातमी वाचून न्यायाधीश लोकहितासाठी त्या बातम्यानाच Public Interest litigation चा दर्जा देऊन आपणहून कारवाई करतात या न्यायालयाच्या कारवाई प्रक्रियेस सू मोटो म्हणतात. या पध्दतीमूळे न्यायालयीन प्रक्रियेस सक्रीयता येताना दिसत आहे.

**३) जनहितार्थ याचिका - Public Interest Litigation :-**

सार्वजनिक हित, ज्या व्यक्तीवर अन्याय झालेला आहे तशी व्यक्ती, ज्या व्यक्तीवर अन्याय झालेला आहे. अशा लोकांना वतीने काहि लोक किवा एक व्यक्ती झालेल्या अन्यायाचे परिमार्जनासाठी जनहित याचिका दाखल करु शकते. 'न्यायमूर्ती कृष्णा अय्यर' यांनी १९८१ मध्ये अखिल भारतीय सोशल कर्मचारी संघ विरुध्द भारत सरकार या प्रकरणाचा निकाल देताना कृष्णा अय्यर यांनी असे म्हटले की, 'ज्या याचिका मध्ये बहुसंख्य लोकांचे हित आहे अशी याचिका व्यक्ती व समूहाकडून कोणालाही सर्वोच्च न्यायालयात दाखल करता येईल.' या निकालापासूनच न्यायालयाच्या सक्रीयतेचा एक भाग म्हणून जनहितार्थ याचिकाकडे पाहण्यात आला तरीही जनहित याचिकांना जेवढे प्रोतहन मिळायला हवे होते. तेवढे या निकालामुळे मिळाले नाही पण पुढे न्यायमूर्ती P.N. भगवती यांनी १९८२ मध्ये जजेस् ट्रान्सपर खटल्यात (P.S. गुप्ता व इतर विरुध्द भारताचे राष्ट्रपती व इतर) खटलयाचा निर्णय देताना जनहितार्थ याचिकांना वाट मोकळी करुन दिली.

आज भारतात मोठ्या प्रमाणावर 'जनहित याचिकाङ व्दारे न्याय मंडळ सक्रीयतेने कार्य करताना दिसून येते सवाेच्च न्यायालय संविधान' घालून दिलेल्या अधिकार क्षेत्रा बाहेर जाऊन समाज हिताचे कार्य करतांना दिसून येत आहे. शांतीभूषण याचे सुपूत्र 'प्रशांत भूषण' यांनी मोठ्या प्रमाणावर सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केल्या आहेत. जनहित याचिका दाखल करण्यासाठी ज्या व्यक्तीवर अन्याय झाला आहे. अशी व्यक्तीच पाहिजे असे बंधन नसल्याने कोणतीही व्यक्ती अन्यायग्रस्त व्यक्तीच्या बाजूने न्यायालयात याचिका दाखल करु शकते. साध्या 'पोस्ट कार्ड'च्या व्दारे ही न्यायालयात जनहित याचिका दाखल करता येते. योग्य त्या जनहित याचिकाची दखल न्यायालयाने घेतली तर आहेच त्या बरोबर खोट्या, दूसऱ्याची बदनामी करणाऱ्या याचिकाकर्त्यांना सर्वोच्च केल्याबद्दल खोट्या याचिका कर्त्यांना दडाची तरतूदही सर्वोच्च न्यायालयाने केली आहे या मुळे असे दिसते की सर्वोच्च या आपल्या कर्तव्याबाबत दक्ष व अधिकाराबाबत सजग असल्याचे दिसते.

*** भारतीतील सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन सक्रीयतेव्दारे विचारात घेतलेली दखल :-**

१९७५ मधील अंतर्गत आणी बाणीच्या काळानंतर भारतीय सर्वोच्च न्यायालय खऱ्या अर्थाने सक्रीय झाले कायदे मंडळाला संसदेत बहुमत आहे म्हणून कायदेमंडळ कोणतीही कृती जी नागरीकांच्या अधिकाराचे हनन करेल ती बेकायदेशीर, घटनाबाह्य असल्याचे निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत भारतीय सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन सक्रीयतेच्या माध्यमातून पुढील बाबी वर आपले निर्णय दिले आहेत.

| | |
|---|---|
| १) सार्वजनिक आरोग्य | २) कामगारांचे प्रश्न व अधिकार |
| ३) बाल कामगार | ४) पर्यावरण |
| ५) मानवाधिकार | ६) प्रदूषण |
| ७) भ्रष्टाचार | ८) महिला लैगिंक छळप्रकरणे |
| ९) पोलीस कस्टडीतील हिंसा | १०) रस्ते अपघात |
| ११) रस्ते वाहतूक | १२) दहशतवाद |
| १३) कायदे कार्यकारी मंडळाची मनमानी | १४) मार्गदर्शक तत्वाची आमलबजावणी |
| १५) वैयक्तीक स्वातंत्र्य | १६) नकारात्मक मतदानाचा अधिकार |
| १७) अनुसूचित जाती जमातीचा विकास | १८) मूलभूत अधिकार |
| १९) निवडणूक सूधारणा | २०) माहिती अधिकार |
| २१) सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान बंदी | २२) समान नागरी कायदा इ. |

न्यायालयाने आपल्या कार्यात सक्रीयता दाखवून व स्वतः पुढाकार घेवून समाजातील अन्याय ग्रस्त लोकांना न्यायदेण्याची कृती म्हणजे न्यायालयीन सक्रीयता होय भारतात प्रामुख्याने १९७० नंतर चा काळ न्यायालयास सक्रीय करताना दिसून येतो. सार्वजनिक हिताला जर बाधा निर्माण होत असेल अशा वेळी न्यायालय सक्रीय तेच्या माध्यमातून निर्माण देते यासाठी समाजाच्या वतीने कोणतीही व्यक्ती न्यायालयात धाव होऊ शकते.

**न्यायालयीन सक्रीयतेची काही उदाहरणे :** * १९९९ पुणे महानगरपालीका आयुक्त अरुण भाटिया बदली प्रकरणात पुणे नागरीकांनी न्यायालयात घेतलेली धाव.

* भ्रष्टाचार (उच्च पदस्थ लोकांचा) या प्रकरणी सरकारने सी.बी. आय अधिकाऱ्याच्या केलेल्या बदल्या अवैध ठरवून रद्द केल्या.
* गंगा नदी प्रदूषण प्रकरणी कानपूर २९ चर्मो उद्योग बंद करण्याचा आदेश सरकारला दिला.
* निवडणूक सुधारणा बाबत उमेदवाराने शिक्षण स्वतः जवळील मालमत्ता व असलेले आरोप यांची माहिती प्रतिज्ञापत्रावर भरण्याचे आदेश दिले.
* बालगुन्हेगारांना हातकडी घालणे गुन्हा ठरवला व त्याबाबत पोलीसाकडून दंड वसुल केला.
* सामान काम समान वेतनाव्दारे राज्यसकारला मार्गदर्शक तत्वे आंमलबजावणीचे आदेश दिले.
* कायदेविषयक सल्ला गौरगरीबाना मोफत पूरवणे याबाबत आदेश दिला.
* १९६७ मूलभूत अधिकार बदल करण्याचा अधिकार संसदेत नाही असा आदेश दिला.
* १९७३ केशवानंद भारती खटल्यात संसदेला संविधानाच्या मूलभूत आराखड्यात बदल करण्याचा अधिकार नाही हे स्पष्ट केले.
* मिनर्व्हामील १९८० खटल्यात लोकतंत्र, स्वातंत्र्य, संघराज्य, कायदा शासन मूलभूत अधिकार, इ. भाग न्यायालयीन पूर्नविलोकनाव्दारे संविधानाचा मूलभूत आराखडा मानले
* क्रिमीलेयरनुसार मागासवर्गीयाला आरक्षण लाभ देण्याचा निर्णय
* मागासवर्गीय २७% आरक्षण राष्ट्रपती आध्यादेश (१९९०, १० ऑ.) सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवला.
* कॅपिटेशन फि आधारे वैद्यकीय अभियांत्रिक प्रवेशला प्रतिबंध घातला.
* ताज महालच्या परिसरातील प्रदुषण करणारे उद्योग, १५ वर्षापूर्वीचे जुने चारचाकी वाहन परवाने रद्द चा आदेश दिला.
* जैन हवाला प्रकरणात C.B.I. ला न्यायालया खरीज इतराचे आदेश न ऐकण्याची ताकीत दिली.
* रतलाम मुन्सीपल कौन्सिलफ सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयीन सक्रीयतेव्दारे खुल्ल्या ड्रेनेज पध्दतीमुळे मानवास विविध अजाराना सामोरे जावे लागते तिची दखल घेण्याचे आदेश दिले.
* 'इंद्र सहानी' विरुध्द भारत सरकार खटल्यात राखीव व जागा आरक्षणाच्या निर्णयाबाबत न्यायालयाने सक्रीय राहून जात हा आरक्षणाच्या निष्कर्षा पैकी एक असून नये राखीव जागा एकूण जागाच्या अर्ध्याहून अधिक असू नये असा निर्णय १९६३, १९९२ साली मंडल आयोगाच्या शिफारशीला मान्यता देताना न्यायालयाने सक्रीयता दाखवली.
* शिला बोरसे यांनी मुंबईतील महिला कैदयाना कस्टडी हिसेला सामोरे जावे लागते या विरोधी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली न्यायालयाने महाराष्ट्र राज्य सरकारला महिलाचे कस्टडीतील हिंसा थांबवण्यास कारवाईचे आदेश दिले.
* विशाखा विरुध्द राज्यस्थान सरकार केस मध्ये स. न्यायालयाने महिलाची कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैगिंक शोषण थांबवण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे घालून दिली.
* सर्वोच्च न्यायालयात सक्रीय ते व्दारे निर्णय घेताना दिल्लीतील ॲटो रिक्षा व बस यांना प्रदूषण थांबवण्यासाठी CNG वापरण्याचे आदेश दिले.
* बंदुहा मुक्ती मोर्चा विरुध्द भारत सरकार खटल्यात सर्वोच्च न्यायालय मजूरांना त्याच्या कामाचे योग्य वेतन देण्याचे आदेश दिले.
* श्रीराम फूड व फर्टिलायअर खटल्यात नागरीकापासून धोकादायक कारखाने दूर असावेत असा निर्णय दिला.
* बॉम्बे पावमेंन्ट डयुलर खटल्यात मुंबई मुन्सीपार्टीला पुर्नवसन करण्याचे आदेश न्यायालयीनसक्रीयतेचे उदा आहे.
* १९९४ मध्ये ३५६ कलमानुसार राज्य सरकार बरखास्त करण्याचा आधार धर्म निरपेक्षतावर आहे असा निर्णय दिला यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रपतीने ३५६ कलमाचा वापर करुन राज्यस्थान, मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेशातील भाजप सत्तारुढ मंत्री मंडळे राष्ट्रपतीने बरखास्त केली व सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय वैद्य ठरवली होता. यामध्ये धर्मनिरपेक्षता हा संविधानाचा मूलभूत ढाचा असे सर्वोच न्यायालयाने सक्रीयते व्दारे माध्यमातून निर्णय दिले.
* ११ मार्च १९९४ मध्ये न्या. S.R. पान्डियन यांनी राष्ट्रपती राजवट निर्णयाचे पुंविलोकन करण्याचा अधिकार सर्वोच्च न यायालयाचा आहे. त्याच बरोबर घटकराज्य विधान सभा भंग करण्याला कायदयाचा आधार नसेल तर न्यायालय विधान सभेबाबत 'Status qus' चा अधिकार असेल असा निर्णय दिला.
* 'परमानंद कटारिया विरुध्द भारत सरकार' खटल्यात अपघाताच्या इमजन्सी रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी हॉस्पीटल मध्ये ॲडमिट करण्यासाठी कोणत्याही औपचारीकतेची गरज नसल्याचा निर्णय दिला व इमरजन्सी रुग्णाला तात्काळ सेवा उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले.
* प्रत्येक व्यक्तीला शुध्द, स्वच्छ पर्यावरण मिळणे हा त्याचा मूलभत अधिकार असल्याने दिल्लीतील धोकादायक उद्योगधंदे दिल्लीतून दूर नेण्याचे आदेश दिले.
* 'हुसेनरा खातुन विरुध्द बिहार राज्य' खटल्यामध्ये एखादया व्यक्तीची आर्थिक स्थिती चांगली नसेल तर तीला मुक्त कायदे विषयक सल्ला देण्याचे व त्याची सूटका करण्याचे आदेश दिले.
* निवडणूकीत मतदारांना उमेदवार पसंत नसेल तर Not Applicable (नोटा) मत देण्याचा निर्णय दिला.
* न्यायालयाने केंद्रिय कृषिमंत्री शरद पवार यांना शासकीय गोदामात अन्न सडते तर ते गरीबात वाटण्याची सल्ला दिला होता.
* अयोध्यातील राम जन्म भुमी जमीनीचे स्थिती 'Status qus' ठेवण्याचा निर्णय दिला.
* अंध अपंगाचा नोकऱ्यातील ३% अनुशेष ३ महिण्यात तात्काळ भरण्याचे आदेश दिले.

* संसद हल्ला प्रकरणी अफजल गुरुला शिक्षा देण्याबाबतचा निर्णय दिला.
* मुंबई बॉम्ब स्फोट प्रकरणाचा निर्णयाबाबत सक्रीयता दाखवली आहे.

*** न्यायालयनी सक्रीयतेवरील आक्षेप :-**

भारतात कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यापेक्षाही जास्त सक्रीयतेने सर्वोच्च न्यायालय कार्य करतांना दिसते नागरीकांना आपल्या मूलभूत अधिकाराची जाणीव जागृती झाल्यामूळे नको त्या कारणासाठी 'रिट्स ' सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्या जातात याचा परिणाम सर्वोच्च न्यायालयाला त्या विचारात घ्यावा लागतात. यातून संसद श्रेष्ठ की सर्वोच्च न्यायालय श्रेष्ठ असा वाद निर्माण होताना दिसून येत आहे. संसद व न्याय मंडळ दोघे ही आपआपल्या क्षेत्रात सर्वोच्च असले तरी दोन्हीचे कार्य समतोल असल्या शिवाय लोक कल्याण होत नाही असे असले तरी न्यायालयाच्या सक्रीतेवर पुढील आक्षेप घेतले जातात.

१) न्यायालय सक्रीयतेमुळे शासनाविषयी जनतेच्या मनाला आत्मीयता राहत नाही.

२) न्यायालय सक्रीयतेमुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामूळे चांगले कार्य अधिकाऱ्याची काम करण्याची इच्छा खचते कारण न्यायालय त्या विरुध्द निर्णय देऊ शकते.

३) न्यायालय सक्रीयतेमुळे सर्वोच्च न्यायालय यामूळे संसदेचे तितरे गृह बनते

४) न्यायालय सक्रीयतेमुळे परंपरागत, पूर्वग्रह दुषित मताचा प्रभाव न्यायदान प्रक्रिये वर पडू शकतो.

५) न्यायालय सक्रीयतेमुळे न्यायालयाच्या हस्तक्षेपामूळे प्रशासन चालवणे कठीण होते.

असे आक्षेप घेतले जात असले तरी यामध्ये न्या. सक्रीयतेचे प्रभावी परिणाम पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) सरकारवर नियंत्रण आल्याने आवश्यक कायदा निर्मितीस प्रोत्साहन मिळाले.

२) जलद न्यायामूळे लोकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास वाढला.

३) सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, प्रश्नावर न्यायालयाने निर्णय दिल्यामूळे न्यायमंडळे लोकांना कायदेमंडळा पेक्षा न्यायमंडळ जवळचे वाढू लागले.

४) प्रशासनातील भ्रष्टाचार, निवडणूक भ्रष्टाचारास काही प्रमाणात लगाम आला.

५) नागरीकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण झाले.

६) राज्याच्या मनमानी वृत्तीला आली बसला.

७) प्रदूषण, कोठडीतील मृत्यु, महिला लैगिक अत्याचारास यामूळे प्रतिबंध आला. या बरोबर अनेक फायदे न्यायालयीन सक्रीयतेचे सांगता येतील.

एकंदरीत भारता सारखी शासन व्यवस्था असणाच्याा देशा बरोबर सर्वच देशात न्यायालयास न्यायालयीन सक्रीयतेचा अधिकार देणे महत्वाचे आहे.

**संदर्भ :-**


१) भारतीय शासन व राजकारण - डॉ. अल्का देशमुख, साईनाथ प्रकाशक, नागपुर

२) भारतीय शासन राजकारण - भा.ल.भोळे, पिपळापूरे प्रकाशन, नागपुर

३) राज्यशास्त्र पेपर १ ला - K. सागर - K. सागर प्रकाशन

४) भारतीय शासन व राजकारण - बी. बी. पाटील, फडकेप्रकाशन कोल्हापुर

५) भारतीय राज्य व शासन व्यवस्था - रा.ज. लोटे , पिपळापुरे प्रकाशन , नागपुर

६) भारतीय प्रशासन - डॉ. व्यंकट बिळगावे गोविंद यमलवाड, अरुणा प्रकाशन लातूर

७) भारतीय शासन आणि राजकारण - प्रा. राम मुठाळ, अंशुल प्रकाशन, नागपुर

८) राजशास्त्र - महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

९) W.W.W.google. com

१०) जनहित याचिका (P.I.L) - अमृत जुन २००९

११) भारतीय स्वदेशी न्यायव्यवस्था - अमृत ऑगस्ट २००८

१२) लोकसत्ता - नागपुर २७ जुलै २००३

१३) लोकसत्ता ठेहाळणी - बिहार राष्ट्रपती राजवट